# Celebration of International Yoga Day



# Yoga Training in Annual Camp



# Yoga Training in Annual Camp



# Covid 19 Survey in Villages



# Blood Donation Camp Program



# News of Blood Donation Camp

## 56 युवाओं ने किया रक्तदान



**हिंगोली** | जिला सरकारी अस्पताल के ब्लड बैंक में रक्त की कमी होने की जानकारी मिलने पर शहर के आदर्श महाविद्यालय में राष्ट्रीय सेवा योजना, वाणिज्य विभाग और जिला सरकारी अस्पताल के संयुक्त से रक्तदान शिविर का आयोजन किया गया था। रक्तदान शिविर में 56 युवाओं ने रक्तदान कर सामाजिक कार्यों में बहुमूल्य योगदान दिया। शिविर का उद्घाटन प्रभारी प्राचार्य डॉ. विलास आघाव ने किया और रक्तदान का महत्व बताया और अन्य विद्यार्थियों को भी राष्ट्रीय कार्यों में सहभागी होने का आह्वान किया। बालाजी चाफाकनडे ने एचआईवी और रक्तदान से संबंधित अफवाहों एवं भ्रांतियों पर मार्गदर्शन किया। कार्यक्रम में कनिष्ठ महाविद्यालय के उपप्राचार्य प्रा. दलवी, पर्यवेक्षक प्रा. शास्त्री, डॉ. आनंद भट, डॉ. संजीवकुमार नरवाडे, डॉ. पीपी जोशी, प्रा. अग्रवाल, जिला सरकारी अस्पताल के नरवाडे, डॉ. स्वाति नूनेवार, दुधालकर, बालाजी चाफाकानडे, गिरि, तडस, हांडगे सहित राष्ट्रीय सेवा योजना के डॉ. नगरकर, डॉ. हाटकर, डॉ. मंगनाले, डॉ. लक्षटे उपस्थित थे।

दैनिक भास्कर BhaskarHindi.com
Tue, 29 November 2022
https://epaper.bhaskarhindi.com

# Blood Donation Camp Program



# Tree Plantation in College Campus



# Tree Plantation in College Campus



# Tree Plantation in College Campus



# Tree Plantation in College Campus



# Self-defence Training for Girls



# Self-defence Training for Girls



# Campus Cleaning Program



# Cleaning Program in Adopted Village



# Campus Cleaning Program



# Cleaning Program in Adopted Village



# Facility of Artificial Tank for Ganesh Festival



# Organization of Various Pledge



# Celebration of Anniversary



# Celebration of Birth Anniversary



# Celebration of Birth Anniversary



# Participation of Students and Faculties in Avhan



# Covid Vaccination Camp Program



# Dental check-up Camp in Adopted Villages



# Health Check-up Camp in Adopted Village



# Mashal Rally organized by SRTMU Nanded on the occasion of Azadi ka Amrut Mohotsav



# Mashal Rally organized by SRTMU Nanded on the occasion of Azadi ka Amrut Mohotsav



# Creation of Forestry Dam in Adopted Village



# Creation of Forestry Dam in Adopted Village



# Creation of Forestry Dam in Adopted Village



# Creation of Forestry Dam in Adopted Village



# Creation of Forestry Dam in Adopted Village



# Health Check-up Camp



# Dental Check-up Camp in Adopted Village



# Animal Check-up Camp in Adopted Village



# Animal Check-up Camp in Adopted Village



# Animal Check-up Camp in Adopted Village



# News of Organization of Various Competition by NSS

epaper.saamana.com
संभाजीनगर, गुरुवार, १६ फेब्रुवारी २०२२ | वर्ष : पाचवे अंक : २१० | पृष्ठ १० | मूल्य : ५.०० रुपये | ★★ डाक आवृत्ती
संस्थापक संपादक : बाळ ठाकरे
ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक
सामना

देवही पळविले!
'शंख' फुंकावाच लागेल!!

## राष्ट्रीय युवादिनानिमित्त रोल प्ले स्पर्धा उत्साहात



हिंगोली, दि. १५ (प्रतिनिधी)- शहरातील आदर्श महाविद्यालयात जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय, हिंगोली यांच्या तर्फे राष्ट्रीय युवादिनानिमित्त जिल्हास्तरीय रोल प्ले स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून आदर्श महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास आघाव तर प्रमुख उपस्थिती जिल्हा कार्यक्रम अधिकारी ज्ञानेश्वर चौधरी हे होते. स्पर्धेत प्रथम पारितोषिक हिंगोली येथील शिवाजी महाविद्यालय, व्दितीय पारितोषिक शासकीय नर्सिंग महाविद्यालय व तृतीय पारितोषिक आदर्श महाविद्यालय तर उत्तेजनार्थ श्रावणी नर्सिंग स्कूल, वसमत यांनी पटकावले. विजेत्या टीमला प्राचार्य डॉ. विलास आघाव व जिल्हा कार्यक्रम अधिकारी ज्ञानेश्वर चौधरी यांच्या उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देण्यात आले.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्राचार्या वर्षा खंदारे, प्राध्यापक डॉ. नगरकर व प्राध्यापिका संगीता मुंडे यांनी काम पाहिले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संजय पवार व बालाजी चाफाकानडे आदींनी परिश्रम घेतले.

# News of organization of Awareness Programme on Abolition of Child Marriage

## बालविवाह प्रतिबंध कायदा व महिला सबलीकरणाविषयी येळी येथे जनजागृती



हिंगोली - येथील आदर्श महाविद्यालयातर्फे राष्ट्रीय सेवा योजना निवासी शिबीर हिंगोली तालुक्यातील येळी येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेमध्ये संपन्न होत आहे. या शिबीरामध्ये जिल्हा महिला व बालविकास अधिकारी विठ्ठल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा बाल संरक्षण कक्षामार्फत बालविवाह प्रतिबंध कायदा २००६ व महिला सबलीकरण या विषयी जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमामध्ये जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सरस्वती कोरडे यांनी महिला सबलीकरण व बाल विवाह निर्मुलन, बाल विवाहाचे दुष्परिणाम या बाबत माहिती दिली. यामध्ये बाल विवाह प्रतिबधक अधिनियम, २००६ नुसार असे विवाह बेकायदा ठरतात आणि या विरोधात गुन्हा नोंदविला जाणे अपेक्षित आहे. अशा गुन्ह्यास एक लाख रुपये दंड व दोन वर्षे सक्त मजुरीची शिक्षा आहे.

या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी ग्रामीण भागात ग्रामसेवक आणि शहरी भागासाठी बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. तसेच ग्रामस्तरावर ग्राम बाल संरक्षण समिती स्थापन करण्यात आली असुन या समितीचे अध्यक्ष सरपंच आहेत व सदस्य सचिव अंगणवाडी सेविका आहे. या सर्वांनी आपापल्या कार्यक्षेत्रात बालविवाह होणार नाही याबाबत योग्यती खबरदारी घ्यावी. तसेच मुलीच्या वयाची १८ वर्ष व मुलाच्या वयाची २१ वर्ष पुर्ण होण्याच्या आगोदर लग्न करणे हा कायद्याने गुन्हा आहे, असे सांगितले. समुपदेशक सचिन पठाडे यांनी महाराष्ट्रातील बाल विवाहाचे प्रमाण आणि जिल्ह्याची स्थिती या बाबत पीपीटीच्या माध्यमातुन सादरीकरण केले. त्यानंतर राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी बाल विवाह प्रतिबंध या विषयावर पथ नाट्य सादर केले. जिल्ह्यातील कोणत्याही ठिकाणी बाल विवाह होणार असल्या बाबतची माहिती मिळताच चाईल्ड लाईन टोल फ्री क्रमांक १०९८ किंवा पोलीस हेल्प लाईन क्रमांक ११२ यावर माहिती देण्याबाबत उपस्थित गावकऱ्यांना आवाहन केले. कार्यक्रमाच्या शेवटी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सरस्वती कोरडे यांनी सर्व उपस्थितांकडून बाल विवाह प्रतिबंधक प्रतिज्ञेचे वाचन करुन शपथ देण्यात आली.

# News of Law Awareness Program

देशोन्नती

# आदर्श महाविद्यालयात कायदेविषयक शिबीर

## लैंगिक अत्याचार, रॅगिंग, अमली पदार्थ आदी प्रतिबंधक कायद्या विषयी दिली माहिती

देशोन्नती वृत्तसंकलन...

**हिंगोली :** शहरातील आदर्श महाविद्यालयात कायदे विषयक शिबीर व पथनाट्याचे आयोजन करण्यात आले होते.

२४ ऑगस्ट रोजी आदर्श महाविद्यालयामध्ये तालुका विधी सेवा समिती व हिंगोली वकील संघ व प्रादेशिक परिवहन विभाग हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने रॅगिंग प्रतिबंधक बाबत कायदा औषधांचा दुरुपयोग व अमली पदार्थांचे सेवन तसेच बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या तरतुदी बाबत मार्गदर्शन ॲसिड अटॅक बाबतचा कायदा याविषयी मुला-मुलींना मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी अध्यक्ष म्हणून आर. व्ही. लोखंडे जिल्हा न्यायाधीश यांची उपस्थिती होती. तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष कमल किशोर काबरा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. के. के. नरसीकर, पोलीस उपअधीक्षक यतीश देशमुख, ॲड. मतीन पठाण, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास आघाव, पोलीस निरीक्षक पंडित कचवे, जिल्हा न्यायाधीश डी. जे. कांबळे, ॲड सतीश देशमुख, आरटीओ विभागातील अनंता जोशी, ॲड. सविता देशमुख, ॲड. रजत देशमुख यांनी कायदेविषयक रॅगिंग प्रतिबंध, बाललैंगिक अत्याचार प्रतिबंध कायदा, ॲसिड अटॅक बाबत मुला-मुलींना योग्य मार्गदर्शन व कायद्याचे महत्त्व सांगितले. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डि. बी. खंदारे यांनी केले. यानंतर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी विविध ज्वलंत विषयावर पथनाट्य सादरीकरण करून जनजागृती केली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रभारी प्राचार्य डॉ. विलास आगाव यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी गोटे, हराळे, विक्रांत भोईने, सुरेश बाहेती तसेच पर्यवेक्षक रमेश दळवी, अनिल शास्त्री, डॉ. सोनलकुमार नगरकर, डॉ. सचिन हटकर, मेजर पंढरीनाथ घुगे, डॉ. आनंद भट्ट, डॉ. सचिन पत्की, नरेंद्र रायलवार, डॉ. एच. डी. चव्हाण, डॉ. महेश मंगनाळे, डॉ. अण्णाजी मडावी, राम तोडकर, जीवन मोरे, संतोष बिडवई, दुर्गादास टापरे, सुभाष जाधव आदींनी कार्यक्रमाच्या



यशस्वीतेसाठी अथक परिश्रम घेतले. सदरील कार्यक्रमास महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी कायदेविषयक शिबिरात व पथनाट्य सादरीकरणात सहभाग घेतला. या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. (विशेष प्रतिनिधी)

Deshonnati Edition
Aug 25, 2022 Page No. 5
Powered by : eReleGo.com

# News of Various Competition on the Occasion of Azadi ka Amrut Mohotsav

देशोन्नती

## आदर्शमध्ये आजादी का अमृत महोत्सव निमीत्त जिल्हास्तरीय देशभक्तीपर समुहगीत स्पर्धा संपन्न

देशोन्नती वृत्तसंकलन...

**हिंगोली**: आदर्श एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हिंगोली आणि विद्यार्थी विकास विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आजादी का अमृत महोत्सव निमीत्त जिल्हास्तरीय देशभक्तीपर समुहगित स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदर्श शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कमलकिशोर काबरा, उद्घाटक म्हणुन संगीतरत्न संगित साधना प्रतिष्ठाण अध्यक्षा अनुराधाताई नांदेडकर तर प्रमुख उपस्थिती आ.शि.सं. चे सचिव रामचंद्र कयाल, कै.बाबुराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयवंत भोयर जिल्हाध्यक्ष,आजादी का अमृत महोत्सव, महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. विलास आघाव, डॉ. एस.एस. नगरकर समन्वयक, आजादी का अमृत महोत्सव, परीक्षक नंदकुमार विडोळकर,मंगेश पांडे, स्मिताताई जोशी, यांच्या उपस्थितीमध्ये, स्पर्धेची सुरवात विद्येची देवता सरस्वती प्रतिमा पुजन करून मान्यवरांच्या शुभहस्ते झाले. कार्यक्रमाचे प्रास्तविक प्र. प्राचार्य डॉ. विलास आघाव यांनी केले तर या प्रसंगी रामचंद्र कयाल, अनुराधाताई नांदेडकर, नंदकुमार विडोळकर यांनी मार्गदर्शन करीत स्पर्धकांना स्पर्धेचे नियम गुणदान पध्दती स्पष्ट करुन सांगितल्या सदरील स्पर्धेमध्ये जिल्ह्यातुन नागनाथ महाविद्यालय, औंढा, बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत, योगानंद स्वामी महाविद्यालय, वसमत, नारायणराव वाघमारे महाविद्यालय, आखाडा बाळापुर, तोष्णीवाल महाविद्यालय, सेनगाव, संतश्रेष्ठ नामदेव महाराज पठाडे महाविद्यालय, हिंगोली, व आदर्श महाविद्यालय, हिंगोली या महाविद्यालयांनी आपले संघ सदरील स्पर्धेसाठी पाठविले होते. तरी सदरील स्पर्धेत प्रथम क्रमांक योगानंद स्वामी कला महाविद्यालय, वसमत यांना ३ हजार, द्वितीय क्रमांक बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत यांना २ हजार तर तृतीय क्रमांक तोष्णीवाल महाविद्यालय, सेनगाव यांना १ हजार देवुन गुणगौरव करण्यात आला. विजेता संघाचे मान्यवरांच्या हस्ते गुणगौरवपर प्रशस्तीपत्र व रोख रक्कमेचे पारीतोषीक देवुन सत्कार करण्यात आला. सदरील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त संघ हे पुढील फेरीसाठी विद्यापीठ स्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत. कार्यक्रमाची सांगता अध्यक्षीय समारोप कमलकिशोर काबरा यांच्या अध्यक्षीय भाषणाने करण्यात आले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अरुणकुमार पांपटवार यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. सोनलकुमार नगरकर यांनी केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आजादी का अमृत महोत्सव समितीचे समन्वयक डॉ. नगरकर, डॉ. बस्वराज लक्षटे, डॉ. आनंद भट्ट, सुरेंद्र साहु, डॉ. तुकाराम हापगुंडे, प्रा. शेला वाघ, डॉ. दयाराम मस्के. नरेंद्र रायलवार, डॉ. सचिन हाटकर, डॉ. प्रशांत जोशी, डॉ. अण्णाजी मडावी, राम तोडकर, तसेच संतोष बिडवई, मदन बैस, जिवन मोरे, मुरलीधर वावधाने, गजानन गुंजकर, धम्मा इंगोले, दुर्गादास टापरे, सुभाष जाधव इत्यादीनी परीश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगिताने करण्यात आली.(प्रतिनिधी)



Deshonnati Edition
Aug 31, 2022 Page No. 3
Powered by : eReleGo.com

# News of Women Empowerment Program in Adopted Village



सांस्कृतिक

## आदर्शच्या राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक शिबिरात महिला मेळावा संपन्न

देशोन्नती वृत्तसंकलन...



हिंगोली ■ १२ फेब्रुवारी रोजी आदर्श महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरात येळी येथे महिला मेळावा संपन्न झाला.

यावेळी अध्यक्ष सरपंच सौ सुनीता शिवकुमार कापसे उपस्थित होत्या. महिला मेळाव्यात मार्गदर्शन करण्यासाठी श्रीमती एस के कोरडे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी उपस्थित होत्या. त्यांनी महिला सबलीकरण व बालविवाह एक समस्या याविषयी मार्गदर्शन केले तसेच विद्यार्थ्यांना बालविवाह प्रतिबंध कायद्याची अंमलबजावणी करण्याची शपथ देण्यात आली. तसेच विभागीय समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना डॉ. संगीता मुंढे यांनी ग्राम विकासात महिलांचे योगदान याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी शिबीर संचालक प्रा.डॉ. सोनलकुमार नगरकर, आदर्श महिला महाविद्यालय प्रभारी प्राचार्य तथा रासेयो कार्यक्रमधिकारी प्रा. डॉ. महेश मंगनाळे, रासेयो कार्यक्रमधिकारी प्रा. डॉ. सचिन हाटकर, क. म. रासेयो कार्यक्रमधिकारी प्रा. सुरेश वऱ्हाड, प्रा. बी. टी. राठोड, प्रा. सपना पुप्पलवाड, प्रा जाधव मॅडम, रासेयो शिबीरार्थी विद्यार्थीनी व सर्व गावकरी महिला मंडळी या प्रसंगी उपस्थित होते. (प्रतिनिधी)

## दम दमा साहेब येथे जोड चौकी मेळावा

गुरुद्वाराच्या वतीने स्वागत

# News of Various Competition on the Occasion of Y-20

देशोन्नती

## आदर्शमध्ये वाय-20 अंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन

### केंद्राच्या युवा आणि क्रीडा मंत्रालयाचा स्तुत्य उपक्रम

देशोन्नती वृत्तसंकलन...

**हिंगोली** ■ आदर्श एज्युकेशन सोसायटी चें आदर्श महाविद्यालयांत, केंद्रातील युवा आणि क्रीडा मंत्रालयाच्या Y-२० या उपक्रमातर्गत, महाराष्ट्र शासन आदेशान्ययें, Y-२० उपक्रमाचा भाग म्हणून हिंगोली येथील आदर्श महाविदयालयात वक्तृत्व स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा ई. स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहें अशी माहिती महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ विलास आघाव यांनी देत आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध देशाच्या G-२० संघटनेचा धर्तीवर, केंद्रातील युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालयाच्या मार्गदर्शनांखाली Y-२० स्थापन करून विविध उपक्रम राबविण्यचें ठरविले आहे.

विशेष म्हणजे महाराष्ट्रातील ११७२ अनुदानित महाविद्यालयातून फक्त ३६ महाविदयालयाची निवड करण्यात आली. विशेष म्हणजे त्यामध्ये हिंगोली जिल्हातुन आदर्श महाविद्यालयांची निवड करण्यात आली. तरी सर्व विध्यार्थीमध्ये G-२० चीं जनजागृती होणाच्या दृष्टीने दि २ मार्च २०२३ रोजी महाविद्यालयांत 'G - २० बाबत' प्रा.डॉ. दयाराम मस्के यांनी यांच्या व्याख्यान आयोजित केलें आहें तसेच वक्तृत्व स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा आदींचे आयोजन करून सदरील स्पर्धेतून गुणवंत ५ विध्यार्थी चीं निवड करावयाची आहे.

जे ५ विध्यार्थी G -२० उपक्रमात देशाच्या प्रतिनिधी सोबत ११ मार्च २०२३ रोजी पुणे येथे संवाद साधणार आहें. सदरील उपक्रमाच्या अध्यक्षस्थानी कमलकिशोरजी काबरा ( अध्यक्ष आ शी सं ) व आदर्श शिक्षण संस्थचे सर्व सन्माननिय पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. सदरील स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ विलास आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली Y - २० चें संयोजक प्रा डॉ सचिन हटकर, IQAC प्रमुख प्रा डॉ सचिन पत्की, प्रा.डॉ.आनंद भट्ट, प्रा डॉ. राजाराम पिंपळपल्ले, प्रा.अमजत पठाण, प्रा.डॉ.आशिष गट्टानी, प्रा.डॉ.अविनाश पावडे, प्रा.सुयोग दोडल, प्रा. राम तोडकर, प्रा.डॉ. गजानन चव्हाण, प्रा. डॉ. तुकाराम हापगुंडे, प्रा.रवींद्र केने, प्रा.महेश मगनाळे, प्रा.ए.एन. बिल्लारी, ई प्राध्यापक वृंद Y-२० उपक्रम यशस्वीतेसाठी अथक परिश्रम घेत आहेत.

येथील आदर्श महाविदयालयात वक्तृत्व स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा ई. स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहें अशी माहिती महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ विलास आघाव यांनी देत आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध देशाच्या G-२० संघटनेचा धर्तीवर, केंद्रातील युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालयाच्या मार्गदर्शनांखाली Y-२० स्थापन करून विविध उपक्रम राबविण्यचें ठरविले आहे.(प्रतिनिधी)

Deshonnati Edition
Feb 28, 2023 Page No. 3
Powered by : eReleGo.com

# News of Lecture on the Occasion of Y-20


देशोन्नती

## आदर्श मध्ये वाय - २०' अंतर्गत व्याख्यान व विविध स्पर्धेचें उदघाटन संपन्न

### केंद्रातील युवा आणि क्रीडा मंत्रालयाच्या वाय - २० उपक्रम

देशोन्नती वृत्तसंकलन...



**हिंगोली :** आदर्श एज्युकेशन सोसायटीचें आदर्श महाविद्यालयांत, केंद्रातील युवा आणि क्रीडा मंत्रालयाच्या वाय - २० या उपक्रमातर्गत, महाराष्ट्र शासन आदेशान्ययें, वाय - २० उपक्रमाचा भाग म्हणून हिंगोली येथील आदर्श महाविदयालयात आज प्रा डॉ दयाराम मस्के यांनीं आपल्या व्याख्यान मध्ये युवा जनजागृती होणे गरजेचे आहे.

त्यासाठी तरुणांनी अभ्यासपूर्ण राजकीय व सामाजिक घडामोडी व युवकांचे कर्तव्य याविषयीं विध्यार्थीनां सखोल मार्गदर्शन केलें. आध्यक्षीय समारोपात विध्यार्थीनां राजकीय अभ्यास, आतराष्ट्रीय घडामोडी व युवकांची जबाबदारी ज्यावर देशाचे भवितव्य आवलंबून असते असे विचार व्यक्त केलें या प्रसंगी पर्यवेक्षक प्रा अनिल शास्त्री, श्ण्न्न समन्वयक डॉ संजय कयाल, अधीक्षक विजय कवाने, वाय - २० समन्व्यक डॉ सचिन हटकर ई उपस्थित होते.तसेच व्याख्यान नंतर वक्तृत्व स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आल्या. आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध देशाच्या वाय - २० संघटनेचा धर्तीवर, केंद्रातील युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालयाच्या मार्गदर्शनांखाली वाय - २० स्थापन करून विविध उपक्रम राबविण्यचें ठरविले आहें. महाराष्ट्रातील ११७२ अनुदानित महाविद्यालयातून फक्त ३६ महाविदयालयाची निवड करण्यात आली. विशेष म्हणजे त्यामध्ये हिंगोली जिल्हातुन आदर्श महाविद्यालयांची निवड करण्यात आली. तरी सर्व विद्यार्थ्यांमध्ये वाय - २० चीं जनजागृती होणाच्या दृष्टीने २ मार्च २०२३ रोजी महाविद्यालयांत वक्तृत्व स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा ई चें आयोजन करून सदरील स्पर्धेतून गुणवंत ५ विध्यार्थी चीं निवड करावयाची आहें. जे ५ विध्यार्थी वाय - २० उपक्रमात देशाच्या प्रतिनिधी सोबत दि ११ मार्च २०२३ रोजी पुणे येथे संवाद साधणार आहें.

सदरील स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्र प्राचार्य डॉ विलास आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली वाय - २० समितीचे समन्व्यक प्रा डॉ सचिन हटकर, प्रा डॉ सचिन पत्की, प्रा डॉ आनंद भट्ट, प्रा डॉ राजाराम पिंपळपल्ले, प्रा डॉ बसवराज लक्षटे, प्रा अमजत पठाण, प्रा डॉ आशिष गट्टानी, प्रा डॉ अविनाश पावडे, प्रा सुयोग दोडल, प्रा राम तोडकर, प्रा डॉ गजानन चव्हाण, प्रा डॉ तुकाराम हापगुंडे, प्रा रवींद्र केने, प्रा महेश मगनाळे, प्रा ए. एन. बिल्लारी, ई प्राध्यापक वृंद वाय - २० उपक्रम यशस्वीतें साठी अथक परिश्रम घेतले

Deshonnati Edition
Mar 3, 2023 Page No. 4
Powered by : eReleGo.com